आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
४ सप्टेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज राष्ट्रपतींकडून व्यक्त/ उद्गीर इथं बुद्धविहाराचं केलं लोकार्पण

- एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रवाशांचे हाल, मुख्यमंत्र्यांसोबतच्या आजच्या बैठकीत तोडगा निघण्याची आशा

- महायुतीनं रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना सत्तेत सहभाग आणि सन्मान द्यावा अशी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची अपेक्षा

- पॅरिस पॅरालिंपिकमध्ये, पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत एफ ४६ प्रकारात सचिन खिलारीनं पटकावलं रौप्य पदक

**आणि**

- विदर्भ आणि मराठवाड्यात पावसामुळं पिकांचं मोठं नुकसान

**<><><><><>**

प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं आवश्यक असून, त्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्र दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात लातूर जिल्ह्यात उदगीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या बोलत होत्या. प्रत्येक क्षेत्रात महिलांची सक्रीय भागीदारी वाढवण्यासाठी बचत गटांची भूमिका महत्वाची असल्याचं त्या म्हणाल्या. राज्य सरकार महिलांचं आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करत असल्याचं सांगून त्यांनी, महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष देण्याचं आवाहन केलं.

वीरमाता जिजाबाई, सावित्रीबाई फुले, संत बहिणाबाई, कवयित्री बहिणाबाई चौधरी, समाज सेविका सिंधुताई सपकाळ, यांच्या कार्याचा आपल्या भाषणात उल्लेख करत राष्ट्रपतींनी, अशा महान महिलांकडून प्रेरणा घेऊन महिला कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला.

केंद्र आणि राज्य सरकारच्या महिला सक्षमीकरणासह शेतकरी आणि युवकांसाठी असलेल्या अनेक योजनांचा उल्लेख करत, त्यांनी या योजनांविषयी समाधान व्यक्त केलं.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच गिरीष महाजन, संजय बनसोडे, आदिती तटकरे हे मंत्रिमंडळ सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, तसंच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतल्या लाभार्थींना लाभाचं वाटप करण्यात आलं.

लाडक्या बहिणींचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रपती स्वत: आल्या याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत एका महिलेला तीन गॅस सिलिंडर देणार असल्याचं सांगून मुख्यमंत्र्यांनी, राज्य सरकारच्या महिला आणि शेतकऱ्यांसाठीच्या इतर योजनांची माहिती दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद होणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन सरकार वाटचाल करत असल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. राज्यात एक कोटी लखपती दीदी तयार करणार असून, लाडकी बहिण योजनेचं राजकारण न करण्याचं आवाहन त्यांनी विरोधकांना केलं. महिला सशक्त झाल्या, तरच आपल्या देशाचा विकास होईल, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचं मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या. लातूर जिल्ह्यात पाच लाखाहून अधिक महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात यश मिळाल्याचं त्यांनी सांगितलं.

उदगीर तालुक्याला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याची, तसंच उदगीर इथं वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची मागणी मंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी केली. उदगीर इथं उभारण्यात आलेल्या बुद्ध विहाराचं राष्ट्रपतींच्या हस्ते लोकार्पण झालं.

राष्ट्रपती मुर्मू यांनी आज नांदेडच्या तख्त श्री सचखंड हुजूर साहिब गुरुद्वारात जाऊन दर्शन घेतलं आणि लंगरची पाहणी केली. नंतर त्या दिल्लीला रवाना झाल्या.

**<><><><>**

संपकरी एसटी कर्मचाऱ्यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बैठक मुंबईत होत आहे. या बैठकीतून संपकऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढू असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे.  राज्यातल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या कालपासून सुरू असलेल्या संपामुळं प्रवाशांचे हाल सुरू आहे. गणेशोत्सवाच्या तोंडावर हा संप पुकारल्यानं गावी जाणाऱ्या नागरिकांसमोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रवाशांची गैरसोय होईल, अशा प्रकारे कोणतीही कृती करू नये, असं आवाहन, राज्य मार्ग परिवहन महामंडळनंही आपल्या कर्मचाऱ्यांना केलं आहे.

**<><><><>**

महायुतीनं रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना सत्तेत सहभाग द्यावा आणि सन्मान द्यावा अशी अपेक्षा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज व्यक्त केली. केंद्रीय मंत्रीमंडळात तिसऱ्यांदा सहभागी झाल्याबद्दल रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मुंबईत त्यांचा सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते.

रिपब्लिकनच्या कार्यकर्त्यांना ‘महायुती सरकार आपल्या दारी’ आणि ‘लाडकी बहिण’ योजनेच्या कार्यक्रमांमध्ये डावललं जातं, इतर शासकीय कार्यक्रमांनाही निमंत्रित केलं जात नाही, याबद्दल आठवले यांनी नाराजी व्यक्त केली. रिपब्लिकन कार्यकर्त्यांना  महामंडळ, जिल्हा नियोजन समिती यासारख्या ठिकाणी नेमणूक देऊन सत्तेत सहभागी करुन घ्यावं, अशी सूचना त्यांनी केली.

निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाची ताकद दाखवण्याचं आवाहन माजी मंत्री महादेव जानकर यांनी केलं. त्याचवेळी ‘रिडालोस’चा अनुभव लक्षात ठेवण्याचा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला.

**<><><><>**

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी आज उत्तर मुंबई मतदारसंघातल्या विविध मुद्द्यांवर स्थानिक प्राधिकरणांची बैठक घेतली. उत्तर मुंबईत झालेलं काम मुंबईचा कायापालट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. यासोबतच मुंबईतल्या समस्या सोडवल्या जातील, असं गोयल म्हणाले.

**<><><><>**

पॅरिस पॅरालिंपिकमध्ये भारताच्या सचिन खिलारी याने पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत एफ ४६ प्रकारात रौप्य पदक पटकावलं आहे.  या कामगिरीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. या स्पर्धेत भारताने आतापर्यंत तीन सुवर्ण, नऊ रौप्य आणि नऊ कांस्य पदकं, अशी एकूण २१ पदकं जिंकली आहेत.

दरम्यान, महिलांच्या गोळाफेक स्पर्धेत अमिषा रावत ही १५व्या स्थानावर राहिली. नेमबाजीत रुद्रांश खंडेलवाल आणि निहाल सिंग हे मिश्र ५० मीटर पिस्तुल एसएच १ प्रकारात पात्र ठरू शकले नाहीत. पॅरा टेबल टेनिस डब्ल्यू एस ४ प्रकारात उपांत्य फेरीत भारताची भाविना पाटील ही चीनच्या झोऊ यिंगकडून पराभूत झाली. पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत पुरुषांच्या ४९ किलो वजनी गटात परमजीतला आठवं स्थान मिळवता आलं.

**<><><><>**

**विदर्भ** आणि **मराठवाड्यात** झालेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असून त्याचा फटका खरीप हंगामातल्या तूर, बाजरी, उडीद, कांदा, मूग या पिकांना बसला आहे. काही ठिकाणी फळबागा जमीनदोस्त झाल्या आहेत. शेतात पाणी साचल्यामुळे कापूस आणि सोयाबीन ही पिकं धोक्यात आली आहेत. जिल्ह्यातल्या ६११  गावांमधल्या १ लाख  २५ हजार ७२४

शेतकऱ्यांचं २ लाख ३ हजार ४१५ हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान झाल्याचा अहवाल कृषी विभागानं दिला आहे.

**धाराशिव** जिल्ह्यात २८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या काळात झालेल्या संततधार पावसामुळे ६ हजार ६७ हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचं तर १७७ हेक्टर क्षेत्रावरच्या बागायतीचं नुकसान झाल्याचा अहवाल कृषी विभागानं दिला आहे. यात उडीद, मूग, सोयाबीन, मका, कांदा, डाळिंब, पेरू, पपई या पिकांचं नुकसान झालं आहे.

**भंडारा** जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असल्याने बागायती शेतीचं नुकसान झालं आहे. मिरची, वांगी, कारले या पिकांचं नुकसान झालं असून कृषी विभागानं पंचनामे करून आर्थिम मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत. मराठवाड्यातल्या बहुतांश जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानाची काल पाहणी केली.

गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे **धुळे** शहराला पाणीपुरवठा करणारा नकाणे तलाव शंभर टक्के भरला. यामुळे शहरातील नागरीकांना दिलासा मिळाला असून पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

**वाशिम** जिल्ह्यातल्या एकबुर्जी या प्रकल्पातही १०० टक्के पाणी भरलं असून त्यातून विसर्ग सुरू आहे.

**सातारा** जिल्ह्यातलं कोयना धरण पूर्ण भरल्यामुळे धरणाचे सहा वक्र दरवाजे १ फूट उघडून विसर्ग करण्यात आला.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणनवीस यांनी आज पाहणी केली. उदगीर तालुक्यात शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पाहणी केल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांशी संवादही साधला. पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत केली जाईल, असं

आश्वासन त्यांनी दिलं. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभं असून योग्य ती मदत दिली जाईल असं मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बातमीदारांशी बोलताना स्पष्ट केलं.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

दोन देशांच्या दौऱ्यातल्या अखेरच्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सिंगापूरमधे पोहोचले. सिंगापूरचे गृह आणि कायदा मंत्री के षण्मुगम यांनी त्यांचं स्वागत केलं. सिंगापूरमधल्या भारतीय समुदायानं लेझीम आणि ढोलताशांच्या गजरात उत्साहाने स्वागत केलं. सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्या निमंत्रणावरुन मोदी तिथं गेले असून वाँग यांनी आज भारतीय प्रधानमंत्र्यांच्या सन्मानार्थ स्नेहभोजन आयोजित केलं आहे. प्रधानमंत्री मोदी या दौऱ्यात सिंगापूरचे अध्यक्ष थर्मन षण्मुगरत्नम, प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग आणि इतर मान्यवरांशी चर्चा करणार आहेत. भारत सिंगापूर धोरणात्मक संबंधांविषयी, तसंच क्षेत्रीय आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर यावेळी चर्चा होईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी ब्रुनेईचे सुलतान हाजी हसनल बोल्किया यांच्याशी चर्चा केली. उपग्रह प्रक्षेपण आणि देखरेखीसंदर्भात महत्त्वाच्या करारावर उभय नेत्यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><>**

मुंबईत आजपासून संरक्षण, दळणवळण, पर्यायी ऊर्जा क्षेत्रातली उपकरणं आणि तंत्रज्ञानाचं प्रदर्शन सुरू झालं. केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी आभासी माध्यमातून या प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. अभय करंदीकर यावेळी उपस्थित होते. देशविदेशातल्या कंपन्या शुक्रवारपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात सहभागी झाल्या आहेत.

**<><><><>**

राज्यातल्या कृषी क्षेत्रात, तसंच बांबू लागवडीसंदर्भात धोरणात्मक, ऐतिहासिक निर्णय घेऊन भरीव कामगिरी केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जागतिक कृषी परिषदेमार्फत विशेष सन्मान केला जाणार आहे. कृषी परिषदेच्या वीस देशांमधल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत येत्या १८ तारखेला मुंबईत एनसीपीए इथं हा सत्कार सोहळा होईल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**